प्रपत्र ब

पंचायत समिती / प्र.अ,मनपा,प्राथमिक शिक्षण मंडळ ______________

शाळांमध्ये उपलब्ध करावयाच्या मुलभूत सोयी-सुविधासंदर्भात सुधारित निकष

(आरटीई मान्यता व नुतनीकरण कालावधी दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२८

शासन निर्णय दिनांक २१ जून २०१३ च्या निकषानुसार

अ.क्र	सुविधा	निकर्ष
१	स्वच्छतागृह (अ) मुलींसाठी १) मुतारी २) शौचालय	(१)६० विद्यार्थ्यापर्यंत १ युनिट (२ मुता-या व १ शौचालय) (२)६० ते १२० विद्यार्थीसंख्या असल्यास १ युनिट (३ मुता-या १ शौचालय) (३)पुढील प्रत्येक ३० विद्यार्थ्यामागे १ अतिरिक्त मुतारी आणि १०० विद्यार्थ्यामागे १ अतिरिक्त शौचालय
२	(ब) मुलांसाठी १) मुतारी २) शौचालय	(१)६० विद्यार्थ्यापर्यंत १ युनिट (२ मुता-या व १ शौचालय) (२)६० ते १२० विद्यार्थीसंख्या असल्यास,१ युनिट(३ मुता-या, १ शौचालय) (३)पुढील प्रत्येक ३० विद्यार्थ्यामागे १ अतिरिक्त मुतारी आणि १०० विद्यार्थ्यामागे १ अतिरिक्त शौचालय.
३	रॅम्प (उताराचा रस्ता)	उताराच्या रस्त्याचा उतार किमान १.१२ यानुसार असावा व पृष्ठभाग हा गुळगुळीत नसावा. तसेच उताराच्या रस्त्याची किमान रुंदी १.२ मी. असावी व त्याच्या दोनही बाजूला दोन फूट उंचीचे कठडे (Hand rail) असावे.
४	पिण्याच्या पाण्याची सुविधा	गावातील उपलब्ध पाण्याच्या स्त्रोतामधून अन्न शिजविण्यासाठी प्रति विद्यार्थी २ लिटर स्वच्छतेसाठी प्रति विद्यार्थी ५ लिटर तसेच पिण्याकरिता प्रति विद्यार्थी २ लिटरप्रमाणे पाणी आवश्यक आहे. त्यानुसार विद्यार्थी संख्या विचारात घेऊन पिण्याच्या पाण्याची साठवण दररोज करावी. गावात सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेव्दारे पाणी उपलब्ध होत असल्यास किंवा नदी/तलाव/बोअरवेलवरुन विद्युत पंपाव्दारे शाळेला पिण्याचे पाणी उपलब्ध होत असल्यास किमान २००० लिटर पाण्याची क्षमता असलेली साठवण टाकी असावी. व पहिल्या ६० विद्यार्थ्यासाठी किमान २ नळजोडण्या असाव्यात,(IS code ४३३८-१९९०) व त्यापुढील प्रत्येक ३० विद्यार्थ्यांसाठी १ नळजोडणी असावी.
५	संरक्षक भिंत (आवारभिंत)	(१)प्रत्येक शाळेला प्रवेशव्दारासह संरक्षक भिंत असवी. (२)पक्की संरक्षक भिंत शक्य नाही तेथे तारेची कुंपण,डिडोनिया/मेंहदी सारख्या वनस्पतीचे कुंपन(Green Fencing) असावे. (३)जेथे वाहतूकीचा रस्ता,जंगली श्वापदे,कॅनॉल,ओढा,नदी असे अडथळे आहेत तेथे पक्की संरक्षक भिंत असावी. (४)आवार भिंतीची उंची भुमिनीपासून किमान सहा फूट आसावी. व प्रवेशव्दार १८ फूट रुंद आसावे. (५)शाळेच्या आवारामध्ये निलगिरी,सुरु,गुलमोहर व कडुलिंब यासारख्या मोठ्या झाडांची लागवड सावलीसाठी करावी.

HEAD MISTRESS
[illegible] ENGLISH MEDIUM SCHOOL

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

अ.क्र	सुविधा	निकर्ष
६	स्वयंपाक गृह	(१)विद्यार्थी पटसंख्या (इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत) १०० पेक्षा कमी असल्यास (Type A किमान क्षेत्रफळ ११.९७ चौ.मी.) (२)विद्यार्थी पटसंख्या १०० ते २०० असल्यास (Type B किमान क्षेत्रफळ १८.०४ चौ.मी. (३)विद्यार्थी पटसंख्या २०० पेक्षा जास्त संख्या असल्यास (Type C किमान क्षेत्रफळ २७.५८ चौ.मी
७	ग्रंथालय	(१) प्रति विद्यार्थी ५ पुस्तके प्रमाणे
८	खेळाचे मैदान	राष्ट्रीय भवन निर्माण संहिता २००५ अन्वये ५०० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार क्रिडांगणाचे क्षेत्र २००० चौ.मी.इतके असावे. तसेच शाळेतील विद्यार्थी संख्या कमी असल्यास १८ मीटर x३६ मीटर = ६४८ चौ.मी.इतके किमान क्षेत्रफळाचे क्रिडांगण असावे.
९	विद्यार्थी शिक्षक प्रमाण	प्राथमिक इ.१ ली ते ५ वी पर्यतच्या ३० विदयार्थ्या मागे १ शिक्षक उच्च प्राथमिक इ.६ वी ते ८ वी साठी ३५ विदयार्थ्या मागे १ शिक्षक
१०	शाळा वर्ग खोली प्रमाण	केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार प्राथमिक शाळेतील ३० विद्यार्थी संख्या व उच्च प्राथमिक शाळेतील ३५ विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वर्ग खोली (४९० squrefeet carpet area with verandah) असावी. तसेच वर्गखोलीचे बांधकाम पक्के असावे व वर्गखोलीत विद्युतीकरण व फळा तसेच खेळती हवा राहाणेस्तव पुरेश्या खिडक्या असाव्यात. सर्व वर्ग खोल्याचे बांधकाम पक्के व भूकंपरोधक (RCC frame structure) असणे आवश्यक असून छत पक्के (RCC Slab) असावे.

सूचना :- प्रत्येक शाळांची मुलभूत सुविधानुसार प्रत्यक्षात नियमानुसार निकर्षात नमुद केल्याप्रमाणे भौतिक सुविधा आहेत किवा नाही याबबत स्पष्टपणे उल्लेख करणे कायदेशीर आवश्यक आहे.

केंद्र प्रमुखाची नांव व सही | शिक्षण विस्तार अधिकारी नांव व सही | गटशिक्षणाधिकारी नांव व सही

शिक्षण अधिकारी

A.O. ... प्राथ.शिक्षण मंडळ, करमाळा

HEAD MISTRESS
NAVBHARAT ENGLISH MEDIUM SCHOOL